


विषय काव्य
सं. क्र. २५५२
REFBK-0025321
REFBK-0025321

# चाळिशी

श्रीहरी भिडे

REFBK-0025321
REFBK-0025321

प्रकाशक :

श्रीहरी भिडे
३, शिल्पाश्री,
उमा नीलकंठ व्यायामशाळेजवळ,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२

मुखपृष्ठ :

वैजनाथ सुतवणी

© सर्व हक्क सौ. शुभदा भिडे

प्रथमावृत्ती :

७ फेब्रुवारी १९८७

मुद्रक :

कृ. भि. राऊळ
सत्यसेवा मुद्रणालय,
अलिबाग–रायगड

मूल्य : १० रुपये

# अर्पण पत्रिका

**परम आदरणीय दादांस–**

नाही लाभले छत्र आपुले
वर्षाहून अधिक सात
जातील वर्षे निघून कितीही
आपुली, स्मृती नित्य हृदयात–
मिळून गेले जे यश थोडे
आप्त करिती कौतुक
जाणीव आहे मनोमनी
हा, आपुला आशिर्वाद–

– श्रीहरी

॥ श्री ॥

# मनोगत

आजपर्यंत कोठेही प्रसिद्धीसाठी न पाठविलेल्या कविता एकदम संग्रहाच्या रुपाने प्रसिद्ध करण्याचं धाडस मी परमेश्वरावर भरवसा ठेऊन करीत आहे.

मी कविता करतो असं एकाद्या परिचीत माणसाने ऐकले की तो माझ्याकडे प्रश्नार्थक नजरेनेच बघतो. दोन महिन्यांपूर्वी कविवर्य श्री. म. पां. भावे माझ्याकडे आले होते. तेव्हा ते म्हणाले 'मराठी साहित्य परिषदेचं' संमेलन आपल्या इथे फेब्रुवारी महिन्यात होणार आहे. त्या वेळी तुमचा कवितासंग्रह तुम्ही कां प्रसिद्ध करीत नाही ? त्यांच्या प्रश्नानी मला एकदम हुरुप आला. विचार केला, अशावेळी आपला कवितासंग्रह प्रसिद्ध करण्यासारखं आपलं दुसरं भाग्य ते कोणत ?

तसं पाहायला गेले तर कवितासंग्रह प्रसिद्ध करण्याचं वर्षा दोन वर्षा पूर्वीपासूनच मनात होतं. 'चाळिशी' हे नांव आणि आणि त्यात चाळीस कविता छापायच्या हेही नक्की केलं होतं, परंतु हातून घडत नव्हतं. ते अचानक कविवर्यांच्या प्रश्नानी घडलं.

संग्रहाला 'चाळिशी' हे नांव देण्याचे कारण म्हणजे माझ्या ४० व्या वर्षी मी कविता लिहू लागलो. आयुष्यात १८ व्या वर्षी नोकरी सुरु केली तेवढा एक भाग सोडला तर सर्वंच गोष्टी मी आयुष्यात उशीरा सुरु केल्या. त्याचं पहिलं उदाहरण म्हणजे वयाच्या ३४ व्या वर्षी गायन शिकायला सुरुवात केली. हे सांगण्याचा उद्देश इतकाच की या ४० कवितांपैकी काही कविता गेय आहेत आणि त्यांना माझ्या स्वतःच्या चाली आहेत. अर्थात

याचेही श्रेय माझे गायनातील गुरु श्री. विनायकराव काळे (जे स्वत: फार मोठे रचनाकार आहेत) यानांच आहे. ज्यांनी मला सूर आणि ताल शिकवला इतकंच नव्हे तर माझा फक्त कविता गायन आणि वाचनाचा कार्यक्रम आयोजित करून मला प्रोत्साहन दिले.

कविवर्य श्री. म. पां. भावे यांनी माझ्या संग्रहाला प्रस्तावना लिहून मूर्तरुप तर दिलेच, पण मागे इतर कामांचा व्याप असूनही माझ्यावरील प्रेमापोटी त्यांनी संग्रहाची प्रूफंही तपासून दिली. आपल्या प्रस्तावनेत कविवर्यांनी ज्या काही सूचना केल्या आहेत त्याचा मी भविष्यकाळात निश्चितच उपयोग करून घेईन.

या कवितासंग्रहाचं मुखपृष्ठावरील चित्र माझे मित्र श्री. वैजनाथ सुतवणी यांनी वर्षा दीड वर्षापूर्वीच काढून ठेवलं होतं ते आज कामी आलं. त्यांचे आभार किती मानावे ?

नवनीत प्रोसेसचे श्री. विकास सामंत आणि प्रिंट आर्टचे श्री. वाझे यांनी सदर चित्रावरून कव्हर करून दिल्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. अलिबागच्या सत्यसेवा मुद्रणालयाचे संचालक श्री. राऊळ आणि त्यांचा कामगारवर्ग यांनी या पुस्तकाची नेटकेपणानी छपाई करून दिल्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

माझ्या सदर संग्रहात अनेक त्रूटी असू शकतील त्या वाचकांनी आपलेपणानी कळविल्यास मी त्यांचाही आभारी होईन.

धन्यवाद !

– श्रीहरी भिडे

# चाळिशी लावण्यापूर्वी–

एकाद्या छंदाची आवड कोणाला केव्हा निर्माण व्हावी याचा काही खास असा नियम नाही. माझ्या माहितीचे श्री. पटवर्धन नावाचे एक गृहस्थ. त्यांना सत्तरीत कविता स्फुरली आणि त्यांनी त्यांचा पहिला काव्यसंग्रह नुकताच प्रकाशित केला. या संग्रहाचे कवि श्रीहरी भिडे हे तर चाळिशीचे. तेव्हा आता त्यांना कविता स्फुरू लागली हेही योग्यच. त्या दृष्टीने त्यांनी संग्रहाला दिलेले ' चाळिशी ' हे नाव नक्कीच सार्थ आहे. या संग्रहातील कविता वाचल्यानंतर प्रथम काय जाणवले असेल तर यातील साधी, सरळ, सुबोध रचना. वाचल्याबरोबर त्यातल्या आशयाशी वाचकाची मैत्री जुळते. काही कविता गेय आहेत आणि त्या तशा असणे हेही स्वाभाविक म्हणावे लागेल. कारण संगीताचे ज्ञान असलेल्या कवीच्या कवितेचे शब्द सुरांचा साज लेवून बाहेर न आले तरच नवल. स्वत: चाली लावून श्री. भिडे आपल्या कविता गाऊन ऐकवितात हा एक त्यांच्या दृष्टीने प्लस पॉइंट. या एकूण ४० कविता म्हणजे कवीचे काव्य प्रांतातील पहिले आशादायक पाऊल होय. या कवितांमधून त्याच्या स्वभावाचे दर्शन तर घडतेच, पण त्यांची ईश्वरावरील श्रद्धाही सहजपणे लक्षात येते. याखेरीज

आपल्या उपहासगर्भ शैलीने काही कवितांतून ते विनोदाचेही दर्शन घडवितात.

ईश्वराला उद्देशून केलेल्या आपल्या पहिल्याच कवितेत कवि लिहितो–

‘किती देतो आहेस भरून दोन्ही हातांनी । गेलो आहे भारावून तुझ्या या दानांनी ।।’ ‘नको देऊ एकही क्षण तुला विसरण्याचा । तोच क्षण होईल माझ्या सर्वनाशाचा ।।’ अशी ही ईश्वरावरील ठाम श्रद्धा. ईश्वरी कृपेविण काहीच होत नाही हा विचार त्यांच्या ‘भजनी बैसोनी अभंग गायिले । त्यात काय केले, सूरही तुमचा ।।’ या ओळीतून व्यक्त होते. भावगीत लेखनातसुद्धा हळुवारता त्यांना उत्तम साधली आहे. प्रेमिकांच्या जीवनात नेहमी अनुभवास येणारा प्रसंग रेखाटताना ते लिहितात, ‘हरवून बसलो मीच मजला, धुंद होतो अंतरी । होईल का कधी भेट आपुली, का स्वप्न हेही प्राक्तनी ।। अथवा प्रेयसीची विरह भावना व्यक्त करतांना आपल्या आवडत्या संगीतातील प्रतिमा वापरून ते लिहितात– षडज पंचम जुळविलेल्या, मीच तारा छेडिल्या । नाद ब्रम्हाच्या सुरातून, मैफिली त्या रंगल्या । छेडिल्या ज्या मीच तारा, आज मजला छेडिती । कळत नाही त्याचवेळी वागले मी का अशी ।। सहज सुलभ शब्द रचनेमुळे गेय कवितेला आवश्यक असणारी लय व नाद साधणे त्यांना शक्य झाले आहे. दुसऱ्या एका कवितेत आपण नेहमीच इतरांकडून फसले जातो ही खंत व्यक्त करून या फसविणाऱ्यांनाही फसविण्यासाठी ते गंमतीने लिहितात, ‘एवढ्या ठिकाणी फसल्यावर सहज मनात आले । एकादी कविता तरी करून तुम्हाला फसवावं ।।’ विनोदी कवितेच्या

संदर्भात त्यांची ' निंदकाचे घर असावे शेजारी ' या म्हणीवरून त्यांनी लिहिलेल्या ' निंदकाचा ब्लॉक असावा समोरी ' या कवितेची आठवण येते. यात ज्या भावना गमतीने व्यक्त केल्या आहेत त्या ' नणंदेचे कार्टे किरकिर करते, खरूज येऊ दे त्याला ' या जुन्या कवितेची नक्कीच आठवण करून देतात. कवी गमतीने लिहितो ' निंदकाची पोरे असू द्या गोरटी । मात्र ती चोरटी व्हावी पुढे ' अशीच मिस्किलतेने लिहिलेली आणखीन एक कविता म्हणजे डॉक्टर व पेशंट यांच्या संबंधाची.

अशारितीने परमेश्वर, प्रणय, विरह, भक्ती, विनोद इत्यादी विविध विषयांनी हा काव्यसंग्रह संपन्न आहे. तरीही कवीने यापुढे कल्पना, आशय, अभिव्यक्ती, सुंदरता, यादृष्टीने जास्त समृद्ध होण्यासाठी अवश्य प्रयत्नशील राहावे. त्यासाठी चाळिशी-पासून स्वीकारलेले हे काव्यवेड असेच जोपासावे की जेणेकरून काव्यरसिकांना काव्यगुणांनी समृद्ध असा त्यांचा दुसरा संग्रह वाचावयास मिळू शकेल.

**– म. पां. भावे**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 2442
काव्य 9७।८८
29339
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

१

किती देतो आहेस
भरून दोन्ही हातांनी
गेलो आहे भारावून
तुझ्या या दानांनी–

अनेक वेळा संकटे
आली एक होऊन,
नेलेस मला निभावून
तूच हात धरून–

नको देऊ एकही क्षण
तुला विसरण्याचा
तोच क्षण होईल
माझ्या सर्वनाशाचा

• • •

कसे फेडू हे दान, देवा कसे फेडू हे दान ॥
बालपणातच बाबा गेले
आप्तजनांनी बहु कष्टविले
तरीही नाही उणे पडु दिले
तुजविण आणि कुणाचे काम ?

थोडे देऊनी अधिक इच्छिले
तरिही तू ते सदैव दिधले
आप्त जनांना पडले कोडे
कसे मला हे सर्व मिळाले ?

कसे कळेना त्यांना देवा
तुझेच सारे दान, मजला तुझेच सारे दान–

कशी फेड करू या दानाची
एकच इच्छा पुरवी माझी
यावा मृत्यू गातच असता
तुझेच अधरी नाम
देवा तुझेच अधरी नाम–

• • •

## ३

शब्द माझे ओठात विरती
सांगू कशा मी भावना
पाहतो जेव्हा तुला मी
हाच अनुभव ये पुन्हा

हरवून बसतो मीच मजला
धुंद होतो अंतरी
होईल का कधी भेट आपुली
की स्वप्न हेही प्राक्तनी

घेशील का समजून कधी तू
निशःब्द माझ्या भावना
पाहतो जेव्हा तुला मी
हाच अनुभव ये पुन्हा—

• • •

सूर वेड्या तव मनाची
समजूत मी घालू कशी
कळत नाही त्याच वेळी
वागले मी का अशी–

षड्‌ज पंचम जुळविलेल्या
मीच तारा छेडिल्या
नाद ब्रह्माच्या सुरातुन
मैफिली त्या रंगल्या

छेडिल्या ज्या मीच तारा
आज मजला छेडिती
कबुल करूनी नाही आले
साथ देण्या तव सुराना
राग माझा मात्र तू त्या
मैफिलीवर काढला

गात नाही प्रथम कधी ती
भैरवी तू गाइली–
मिळत होते प्रेम मज ते
फिरूनी तू देशील का ?
षड्‌ज पंचम जुळवुनी ते
हाती मम देशील का ?
आजवरी मी भोगलेला
विरह आता संपवी–

• • •

## ५

येता कधी न जवळी
का लावलेस वेड
माझ्याच का मनाला
होती तुझीच ओढ...१

भुललो कसा कळेना
लावण्य यौवनाला
नाही विचार केला
माझ्याच मी रुपाचा...२

स्वप्नात धुंद होतो
धुंदीत गात होतो
लावण्य ते सुरांचे
अनुभवत मीच होतो...३

लावण्य ते सुरांचे
कधीही न संपणारे
क्षणमात्र राहणारे
लावण्य यौवनाचे...४

माझ्याच मी रुपाचा
केला आता विचार
स्वर हाच जीव माझा
त्याची मनास ओढ...५

• • •

# ६

किती दिवस करीत होतो
प्रतीक्षा तुझ्या भेटीची
तळमळत होतो आतल्या आत
एका तुझ्या कटाक्षासाठी—
नाही देत तुला उपमा
मदिरेची किंवा मदिराक्षीची
त्या दोघींपेक्षा तुझी नशा
वाढवीत होती माझी बेहोशी—
आणि आज अचानक
आलीस जवळ
आणि थांबवलीस
माझ्या जिवाची तळमळ—
तुझ्या भेटीनी
मी इतका आनंदलो आहे
की जणु सगळं जगच
जिंकायला निघालो आहे—
आहे मला कल्पना
होईल वाच्यता आपल्या भेटीची
पण नाही वाटत त्याचं काही
असताना तू जवळ अशी—

आली आहेस इतकी जवळ
की झाली आहेस
जणु माझी सावली
सावलीसारखी असलीस
तरी एकच कर
संध्याकाळच्या सावलीसारखी
माझ्यापुढे जाऊ नको
आणि परत मला
एकटा सोडून
तळमळत ठेऊ नको

● ● ●

७

हळव्या मनाचे प्रेम माझे
तुजसी नाही कधीच कळले
सांगण्या आधीच काही
तू मला अव्हेरिले–

सूर मज बेसूर गमला
तालही बेताल झाला
लय कळेना आज मजला
काय मी अपराध केला ?

सर्व मी ते साहिले
मीच मज सांभाळिले
सूर मी गोंजारिले
त्यांनी न मज अव्हेरिले–

हळव्या मनाचे प्रेम माझे
सूर ताला समजले
प्रेम त्यांचे मजसि मिळता
मन किती आनंदले–

• • •

शा. क्र.
शाखा (स्थळ प्रत)

## ८

साठविते किती मूकपणाने
        मन आपुले वेदना
एक मनाच्या कधी न कळती
        दुसऱ्या संवेदना

मूकपणाने साठविलेल्या
        अशा काही वेदना
धीर न देती मनास आपुल्या
        मनातले सांगण्या–

मूकपणाने साठविलेल्या
        अशा सर्व वेदना
प्राणही गेला तरी ना उरती
        त्यांच्या मागे खुणा

• • •

९

कशाला धरतो अभिलाषा
कोणी 'आपलं' म्हणेल याची
आहे कुठे माझ्यात
एक तरी बाजू जमेची ?

नाही रुप, नाहीत गुण,
नाही विद्या, नाही पैसा
मग मी कोणाला
आवडावा कसा ?

भेटतात काहीजण
आपलेपणा दाखवणारे
पण आलेले असतात ते
आपल्याच कामापुरते–

नाही राग माझा
कधीच कोणावर
प्रत्येकजण जात असतो
आपल्याच नशिबाबरोबर–

विसरून मी सगळं
पहातो आहे वाट त्या दिवसाची
तो दिवस असा उजाडणार आहे
जेव्हा सगळेजण मला 'आपला' म्हणणार आहेत

पण ते ऐकायला
मी कुठे असणार आहे ?

• •

१०

धुंद करतो मला
तू माळलेल्या
सुरंगीच्या
गजऱ्याचा सुवास–

किती आहे
भाग्यवान तो गजरा
मिळाला त्याला
तुझा सहवास–

सुरंगीच्या गजऱ्याचं
एक वेगळेपण असतं
कोमेजल्यावर
दिला फेकून
तरी
जातो आपला सुगंध ठेऊन

मला वाटतं
व्हावं मी सुरंगीचा गजरा
केव्हातरी माळशील
तसाच
कोमेजल्यावर
फेकूनही देशील
तो भाग वेगळा–

• • •

११

अधरातुनी जे ना कधी आले
त्या शब्द कैसे मी म्हणावे ?

नेत्रात कधी ना दाटले
त्या अश्रू कैसे मी म्हणावे ?

हृदयात नाही कधीच फुलले
त्या प्रेम कैसे मी म्हणावे ?

सांगूनही ना समजले–
त्या 'आपुले' मी का म्हणावे ?

उकलेल का कधी मजसी कोडे
का सर्व मी विसरून जावे ?

• • •

१२

म्हणतो मी जेव्हा
‘ नालायक ’ दुसऱ्याला
त्याची ‘ लायकी ’
मला पटलेली असते
फक्त चारचौघात
कबुली द्यायची
माझीच ‘ लायकी ’ नसते–

म्हणतो मी जेव्हा
‘ खोटा ’ दुसऱ्याला
त्याच्या खरेपणाबद्दल
माझी खात्री असते
फक्त ‘ खरंखोटं ’ ठरविण्याची
माझ्यातच हिम्मत नसते–

करतो मी जेव्हा
दुसऱ्याची निंदा
येत असते मनातून
ओठावर स्तुती
नाही येत करता मन मोठं
कीव वाटते मला
माझ्याच मनाची–

• • •

## १३

असूनही दिवस कोजागिरीचा
का उदास माझं मन
बसली आहे प्रियाही रुसून
शोधतो आहे मी त्याचं कारण–

असूनही दिवस कोजागिरीचा
नाही त्या चंद्राचंही दर्शन
काय उपयोग करून जागरण
चंद्रालाच लागलाय खग्रासग्रहण–

सुटेल चंद्र ग्रहणातून
चांदणं शिंपीत जाईल निघून
मी मात्र जागाच विनाकारण
शोधत प्रियेच्या रुसण्याचं कारण–

• • •

## १४

प्रेम केले हाच माझा
केवढा झाला गुन्हा–

मीही केली कशी अपेक्षा
तव प्रेम नसता मजवरी
कबुल करतो भूल पडली
प्रेम केले तुजवरी–

सांग शिक्षा काही आता
संपलो आता इथे
मात्र माझे प्रेम आहे
तुजवरी सखी हे खरे–

• • •

## १५

नसतात सगळीच माणसं विचारी
म्हणून ......
आपणही व्हायचं का अविचारी ?
नसतं वागायचं
' जशास तसं ' प्रत्येक वेळी
तसं वागून कळते
आपल्याच मनाची पातळी–
कावळ्याच्या शापाने
जशी गाय मरत नाही
तसं कोणी काही बोलल्याने
आपलं नशीब बदलत नाही–

• • •

१६

भेटली एक तरुणी रस्त्यांत
दाढीवाल्या कवीला
पाहताक्षणीच बसून प्रेम
त्याने घातली मागणी तिला

तरुणीही नव्हती कच्ची
म्हणाली देऊन पत्ता
घरी येऊन भेटा
म्हणजे मारू नितांत गप्पा

गेला शोधत दुसऱ्या दिवशी
तिने दिलेला पत्ता
पाहुन तिला थिजून गेला
दाढीवाला पुरता

पिकले होते केस
आणि तोंडात नव्हते दात
दिसतं तसं नसतं
म्हणत बसला चोळीत हात

• • •

## १७

नाही करता येत, माणसाची पारख मला
प्रत्येक माणूस वाटतो, मला भलताच चांगला
अवलंबून राहतो, ज्याच्यावर विश्वासानी
तोच गळा कापतो, माझा केव्हाच केसांनी
ऐकून अडचण कोणाची, पैसे उसने देतो
पाहून माझा भिडस्त स्वभाव, मलाच तो फसवतो
आपला समजून ज्याच्या जवळ, मनातलं बोलतो
मागेपुढे त्याचाच तो, गैरफायदा घेतो
केलं कोणावर प्रेम, तर तिथंही मी फसतो
माझ्याऐवजी दुसराच, तिला आवडलेला असतो
नका घेऊ मनावर, तुम्ही यातलं काही
तुम्हाला उद्देशून, काही हे लिहिलं नाही
एवढ्या ठिकाणी फसल्यावर, सहज मनात आलं
एकादी तरी कविता करून, तुम्हाला फसवावं.

• • •

## १८

झाली आता चाळीशी
काहीतरीच करून राहिलोय
या अशा उतार वयात
काव्य प्रसवू लागलोय...... १
नव्हती मला कल्पना
असं काही होईल याची
घेतली असती औषधं
होणारं थांबण्याची...... २
बघून माझी अवस्था
मित्रांना पडली काळजी
दिला त्यांनी सल्ला पोक्त
होत आहेत तर होऊ देत
फक्त दोन किंवा तीन पुरेत...... ३
कीव वाटून त्यांची
माफ केलं त्यांना
पूर्वजांनीच सांगितलेलं
कसं आठवत नाही यांना
आले देवाजीच्या मना
तेथे कोणाचे चालेना...... ४

• • •

१९

निंदकाचा ब्लॉक, असो द्या समोरी
मात्र पावसाळी, तोची गळो ।।

निंदकाचे घरी, असो द्यावा फोन
मात्र तो निष्प्राण, असो द्यावा ।।

निंदकाचे घरी, असो द्यावा टी. व्ही.
मात्र त्यावरी काही, दिसो नये ।।

निंदकाची पोरे, असो द्या गोरटी ।
मात्र ती चोरटी, व्हावी पुढे ।।

निंदकाची भार्या, असो द्या अबोल ।
' मुक्याने ' बोलेन, तिजपाशी ।।

नको करू देवा मला, निंदक कोणाचा
होईल घोटाळा, सगळाची ।।

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2452
क्र. क्र. 41/6/76
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

२०

नेहमीच जगी या, उलटे कैसे घडते ?
रसिकाची बेडी, अरसिका हाती पडते.
असतो कोणी, खरोखरी विद्वान
नसते त्याची, अर्धांगीला जाण.
असतो कोणी, ताल सुरांचा लोभी
अर्धांगी म्हणतसे, हा बेसूर आहे भारी.
असतो कोणी, कलागुणांचा भक्त
अर्धांगी तयाची, सदा त्यावरी रूष्ट
असतो कोणी, खाण्यामधला दर्दी
अर्धांगी तयाची, कधी हौस ना पुरवी
अपवाद कसा मी, आहे साधाभोळा
अर्धांगी म्हणतसे, हा किती आहे वेंधळा.
जरी पडली बेडी, रसिका अरसिकेची
तरी त्यातच वाढे, संसाराची गोडी

● ● ●

## २१

येतो म्हणूनी सांगूनी गेला
वाट आता मी पाहू किती ?
का सवतीनं गाठून मधेच तुम्हाला
नसेल नेलं ना आपुल्या घरी ?

कशी काय तुम्ही भुरळ पाडता
रुप नि पैसा नाही तरी
भुलले मी पण कशी तुम्हाला
आता सांगते खरोखरी

क्षणभंगुर ते रुप नि पैसा
असला जगी त्या मान जरी
सरस्वतीच्या पूजकाची का
करील लक्ष्मी बरोबरी ?

विनोदबुद्धी जातिवंत ती
हांसवित ठेवी सर्वांना
मनही तुमचं असंच मोठं
आता उमजलं सर्वांना

नाही सवती मत्सर उरला
अहो, स्त्रीस्वभाव जागा झाला
तुमचा लौकिक मनोमनी पटला
वाट पाहिन कितीही मी आता

• • •

## २२

पूर्व दिशेला उगवे रवी तो
कोमल आपुले किरण घेऊनी
प्रसन्न वाटे एक प्रहर मग
ताप न साहे त्याचा अवनी
        रवी तोच पण माध्यान्हीच्या
        चटके सोशीत वदते अवनी
        ' रजनीनाथ तो कितीतरी शीतल
        ताप जाय मम त्याला बघुनी '
रवी शशी हे खरेच द्योतक
भेद दाविती सुखदु:खाचा
दु:खाविण का मिळते सुख कधी
मार्ग चालता आयुष्याचा

• • •

२३

असतात काही माणसं, अशा स्वभावाची
नावं दुसऱ्यांना ठेवण्यांत, हयात जाते त्यांची

काढतात शोधून चटकन्, दुसऱ्याचे वर्म
नाही आठवत यांना, कधी स्वतःचेच कर्म

नसते यांच्यांत हिम्मत, तोंडावर बोलण्याची
नाव सांगून दुसऱ्याचे, लपतात त्यांच्या पाठीशी

समजतात ही माणसं, स्वतःला विद्वान्
अन् करतात चटकन्, कुणाचाही अपमान

यांच्यासाठी जरी कोणी, काही मनापासून केलं
तरी यांचं आपलं नेहमी, मी म्हणतो तेच खरं

असले असे महाभाग, परिचयांत तुमच्या कोणी
नका घेऊ मनावर, त्यांची कुत्सित बोलणी

• • •

## २४

धडपडत होता पतंग एक
प्रीतीसाठी ज्योतीच्या
ज्योतीला कुठे होती पर्वा
प्रीतीची त्या पतंगाच्या

आले होते आजपर्यंत
अनेक पतंग प्रीतीसाठी
पंख जाळून झाले निष्प्राण
ज्योतीला नव्हती पर्वा त्यांची

पहात होता अवस्था
पंख जाळलेल्या पतंगांची
तरीही कमी होत नव्हती
ओढ ज्योतीच्या प्रीतिची

प्रीतीसाठी ज्योतीच्या
पतंग पुढे झेपावला
पंख जाळून ज्योतीने
निष्प्राण त्याला केला

समजेल का कधी ज्योतीला
व्यथा पतंगाच्या प्रीतीची
का कुर्बानीसाठीच प्रीतीच्या
निर्मिती ही पतंगाची ?

• • •

२५

दिलं आहे देवानी तुला
सौंदर्य नि गोड गळा
काय केलास उपयोग त्याचा
प्रश्न माझा नेहमीचा खुळा

सहवासानी तुझ्या
मी नेहमीच सुखावतो
तुझ्यासाठीच एखादी
बंदीश तयार करतो

वाटतं ऐकावी
तुझ्याच गळ्यांतून
बंदीश माझी एकादी
पाहतो आहे मी वाट
त्या शुभ दिवसाची

• • •

## २६

काय मागू देवा
अधिक मी तुझियापाशी ?
वाढविल्या पापराशी आजवरी

नाही दिले प्रेम
आजवरी कोणा
आप्त स्वकियांना कष्टविले

नाही केला परमार्थ
सदा पाहिला मी स्वार्थ
समजला नाही अर्थ अर्थापुढे

भजनी बैसोनी
अभंग गाईले
त्यात काय केले, सूरही तुमचा

आता झाली उपरती
पैलतीर दिसता पुढती
नको जन्म याच्या पुढती
कष्टविण्या कोणा

• • •

२७

एकदा एका माणसाच्या
पायात रुतला काटा
दोन दिवस वाट पाहून त्याने
एक डॉक्टर गाठला
तपासून त्याला डॉक्टरनी
सल्ला आपला दिला
दात सगळे खराब आहेत
ते आधी काढून टाका
आला बिचारा दात काढून
पण वाटेना त्याला बरं
तपासून त्याला डॉक्टर म्हणाला
अपेंडिक्स वाढलंय थोडं
काय मग करतो बिचारा
घेतलं अपेंडिक्स कापून
गुण नाही आला त्याला
एवढं सगळं करून
आता मात्र डॉक्टरसुद्धा
थोडा चक्रावला
डोक्यापासून पायापर्यंत
पुन: त्याला तपासला
पाय त्याचे तपासताना
दिसला डॉक्टरला काटा
भूल परत देऊन शेवटी
काढला त्याचा काटा

• • •

## २८

सगळेच झाले ऋतु वसंत
तर ग्रीष्म कुणी व्हायचं
ग्रीष्माशिवाय वसंताचं
महत्व कसं कळायचं ?

सगळेच झाले श्रीमत
तर गरीब कोणी व्हायचं ?
गरिबांशिवाय श्रीमंतीचं
अस्तित्व कसं जाणवायचं ?

सगळेच झाले पंडित
तर मूर्ख कोणी व्हायचं ?
मूर्खांशिवाय पंडितांचं
पांडित्य कोणी ऐकायचं ?

सगळयाच झाल्या मेनका
तर कुब्जा कोणी व्हायचं ?
कुब्जेशिवाय मेनकेचं
सौंदर्य कसं पाहायचं ?

सगळेच झाले गायक
तर श्रोता कोणी व्हायचं ?
श्रोत्यांशिवाय गायकाचं
गायन कसं रंगायचं ?

साधण्यासाठी समतोल
निर्मिती ही देवाची
न उपजो भावना
माझ्या मनी विषमतेची

• • •

## २९

माणसाचं जीवन आहे
बुद्धीबळाचा डाव
कसोशीने प्रत्येकजण
आपली टाळीत असतो हार

ओळखून डाव प्रतिस्पर्ध्याचा
प्रत्येकजण खेळत असतो
दिला कोणी शह
तर काटशह तयार असतो

कधी कधी वाटतं आपला
विजय होतोय असं
तेवढ्यात एकादं प्यादच
मध्ये येऊन डाव उलटवतं

एवढ्या मोठ्या राजाला
प्याद करतं हैराण
उंट, घोडे, हत्ती, वजीर
बघतात राजाची दाणादाण

असा हा डाव बुद्धीबळाचा
कधीच न संपणारा
पण प्रत्येक जण आहे
त्यातच रंगलेला

माणूस असून नाही गेलो
याच्या वाटेला कधी
कारण घोड्यासारख्या उड्या
मला मारता येणार नाहीत

आणि सरळमार्गी असल्यानी
उंटाची तिरकी चाल
मला चालता येणार नाही

• • •

## ३०

पहिल्याच भेटीत जुळल्या
आपल्या मनाच्या तारा
जशा जुळतात तानपुऱ्याच्या
षड्ज पंचमाच्या

त्याच जुळलेल्या खर्जातून
ऐकत होतो गंधाराची गोडी
त्याच धुंदीत जमवून गायलो
तुझ्यावर रचलेली ‘ जयजयवंती ’

तेव्हापासून आजपर्यंत जगतो आहे
मिळालेल्या तुझ्या साथीच्या जोरावर
बेभान होऊन गातो आहे
लोकांची वाहवा मिळवतो आहे

पण आजच कसा ऐकला
अचानक तुझा बेसूर
का माझ्याकडूनच
काही झाली कसूर ?

खरं सांगतो तुला, माझा तोच आहे सूर
कदाचित् तुलाच
आवडला असेल दुसरा कुठला सूर.
तुझ्या आवडीबद्दल माझी तक्रार नाही

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २५५२
९/७/८
२५३३९
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

माझ्या सुरावर माझा विश्वास आहे
नाही म्हणायला मी थोडा
विचलीत मात्र झालो आहे
असला तुझा विश्वास माझ्या सुरावर

तर नक्कीच येईल
आणि मिळवशील
माझ्या सुरांत सूर
आणि नाही आलीस तरी

मी मात्र नाही शोधणार
तुझ्याशिवाय दुसरा सूर
जरी असलीस तू
माझ्यापासून कितीही दूर

• • •

# ३१

लग्नाच्या हॉलमधे, एक होती बाथरुम
नांव तिचं पडलं होतं, गाणारी बाथरुम
आंघोळीला कोणीही, आतमधे गेलं
बऱ्या वाईट आवाजात, त्याच गाणे सुरू व्हायचं

कोणीही असता किती, संगिताचा द्वेष्टा
आत गेल्याबरोबर, तो गळा काढून गायचा
गेला जरी आंघोळीला, आत एकादा मुका
असेपर्यंत आत, त्याला सुरेख कंठ फुटायचा

आला होता नवरदेव, एकदा एक तिथे
पैज लावून म्हणाला, मी नाही गाणार इथे–
इतरानी त्याला, बराच समजावला
पण हा महाभाग, अगदी हट्टाला पेटला

उचलून विडा पैजेचा, जेव्हा आत गेला
काढण्या आधीच कपडे, त्याला गळा फुटला
हारल्यामुळे पैज, वळली त्याची बोबडी
गाणाऱ्या बाथरुमला, आतून नव्हती कडी

• • •

## ३२

एक होती बाई
तिने घेतली ‘ लूना ’ नवी कोरी
गेली दाखवायला मैत्रिणीला
कौतुकाने तिच्या घरी
मैत्रीण होती ‘ ऑलराऊंडर ’ जरी
अंगानी होती ‘ हेवीवेट ’ पुरी
म्हणाली ‘ बघू, दे किल्ली ’
कशी आहे ‘ लूना ’
नव्याकोऱ्या ‘ लूना ’चा
मोह तिला आवरेना–
चालू करून ‘ लूना ’
मैत्रिण बसली सीटवर
टायरला नव्हती
कल्पना खरोखर
क्षणार्धात त्याची
हवाच निघून गेली
लूनावाली बाई
चक्कर येऊन पडली

• • •

३३

कोण तुजसम सांग मंत्रीराया
कैवारी सदया ॥
वांछिले ते मिळवूनी देसी
आपुल्या आप्त स्वकीया ॥
कोण तया त्राता
तुजविण कोण तया त्राता ॥
परिक्षेत गुण असले कमी तरी
मिळवूनी देसी प्रवेशा।
परवाने वा असो निविदा
समजूनी घेसी 'अर्था'।
कृपाप्रसादे पळती तस्कर
ठेवूनी तव पदी माथा।
अजाण सेवक होती निलंबित
न कळे कुणा ही किमया।
आश्वासन तू देसी भाषणी
गरिबी संपविण्याचे।
संपविती ते गरिबी
तुजसम कैवारी ज्या लाभे
तूच तया त्राता
कोण तुजसम सांग मंत्रीराया
कैवारी सदया ॥

## ३४

देवा तुझ्या द्वारी
उभा आहे प्रहरभरी
निरखितो भक्त मंडळी
देवा तुझी...... १
येती देवा तुझ्या
भक्त दर्शनाला
विकूनी निर्माल्याला
फुलवाला...
सांभाळी चपला...... २
भेसळ करून तुपात कशाची
बांधीती पूजा तुझी
त्याने देवा...... ३
जोडोनिया धन
करोनी दुष्कर्मे
शांतविण्या मना
'तुला' दान देती...... ४
कुणी काही बोला
कुणी काही सांगा
पापाची त्या पर्वा
कोणी का करावी ?...... ५
देवा तुझ्या द्वारी
उभा आहे प्रहरभरी
असलो भक्त मीही जरी
सांभाळी तोल माझा...... ६

• • •

## ३५

पकडली टिटवाळा ‘ आधी तेज ’
सगळी गर्दी भेदून
चढलो डब्यात वीरासारखा
हातातल्या बॅगेची ढाल करून...
दिली दाद गर्दीतही कोणी
पाठीवर शाबासकी देऊन
बघण्यासाठी त्याचा चेहरा
बघत होतो मागे वळून...
तेवढ्याच वेळात गेलं पाकीट
माझा खिसा सोडून...
उतरताच स्टेशनवर
देण्यासाठी तक्रार
पोलीस स्टेशनवर गेलो
नोंदवताना तक्रार...
ऐकून गोष्टी
चांगलाच ज्ञानी झालो
सांगत होते ‘ साहेब ’ मला
येईल तुमचं पाकीट पोष्टानी
असला जर पाकीटमार
खरा खानदानी...

पैसे सोडून बाकी वस्तू
काय त्याच्या कामी ?
पहात होतो वाट पत्राची
आलं एकदाच दोन महिन्यांनी
पत्र फोडलं अधीरपणानी
ते पाठवलं होतं
जनतेच्या रक्षणकर्त्यांनी.
आहे तक्रार ख़री तुमची
पण आम्हाला नाही कोणी मिळालं
केस तुमची करीत आहोत बंद
एवढंच त्यात लिहिलं होतं.

• • •

## ३६

येऊ दे आता मृत्यू केव्हाही
नाही वाटणार त्याची भीती काही
याहीपूर्वी त्याला घाबरत नव्हतो
पण जरा 'सबुरीनी' ये, असं म्हणत होतो.
डाचत आहेत अनेक शल्ये, लहानपणापासून
जी ठेवली आहेत मनाच्या कोपऱ्यात
जशीच्या तशी बंद करून
आठवतात आजही
सगळे प्रसंग जसेच्या तसे
समजत नाही मला
सगळेच माझ्याशी का वागत होते असे ?
दाखवायच्या होत्या, करून अनेक गोष्टी
पण न टाळता, स्वतःची जबाबदारी
देवाच्या कृपेनीच
मला मिळालं सर्व काही
आता मात्र माझ्याशी
कोणी वाईट वागत नाही

• • •

## ३७

चालतो आहे मार्ग यशाचा
पायाखाली बघून
तरीही लागते ठेच
तेव्हा बघतो मागे वळून

कोणाला आहे वेळ
चौकशी करायला थांबून ?
केव्हा केव्हा जातो मी
खरोखरच थकून

वाटतं घ्यावी विश्रांती
थोडा वेळ थांबून
पण नाही चालणार मला
असं मध्येच आता थांबून

अजून खूप चालायचंय
दमून कसं चालेल ?
लागल्या कितीही ठेचा
तरी थांबून कसं चालेल ?

मार्ग चालत राहणं
माझ्या हाती आहे
यश देणं न देणं
त्याच्या हाती आहे

• • •

## ३८

बागेमधले गेंद गुलाबी
लकलकती दंवबिंदू त्यावरी
भ्रमरांचीही लघटच भारी
नटलेली ती हरित धरित्री
स्फटिकासम ते निर्झर सुंदर
अथांग सागर निरभ्र अंबर
सप्तरंगीच्या गालीच्यावर
अगणित तारे अन् नक्षत्रे
स्वर्गातील जणू हिरे उधळले

पडले माझ्या मनास कोडे
कुणासाठी हे कुणी निर्मिले ?
कुजबुजले कुणी कानी माझ्या
मूकशब्द ते सांगत होते
जीवन करण्या सुसह्य सगळे
ज्या देवाने आम्हा निर्मिले
सुसह्य करूनी जीवन अवघे
त्याचे आम्हा ऋण फेडू दे

• • •

३९

स्वप्न ते माझ्या मनीचे
सखी सांग कैसे तुज कळावे ?
वाटते मी सूर व्हावे
पण तान त्याची तू असावे
वाटते तू मुरली व्हावे
अन् मी तुला ओठी धरावे
वाटते काही पहावे
पण नेत्र माझें तू असावे
वाटते कांही लिहावे
पण शब्द माझे तू असावे
वाटते थोडे जगावे
पण श्वास माझा तू असावे
एकदा मज म्हणुनी ' आपुला '
स्वप्न मम साकार व्हावे
स्वप्न हे माझ्या मनीचे
सखी सांग कैसे तुज कळावे

• • •

४०

प्रतिभेस मीच माझ्या
सांगू कसे कळेना
समजून तिजसी आपुली
मज आपुला म्हणेना

भेटून रोज मज ती
घायाळ फक्त करते
परी आपुला म्हणोनी
कधीही न वागविते

जगणे अशक्य मजला
प्रतिभे तुझ्याच विरहीं
विरहात सांग कधी कां
सुचले कुणास काही ?

REFBK-0025321
REFBK-0025321